
# मराठी ग्रामीण कादंबरी

## आस्वाद आणि समीक्षा



संपादक

**डॉ. संग्राम टेकले**

ISBN : 978-93-83672-51-6

# Marathi Gramin Kadambari Aswad Ani Samiksha

* मराठी ग्रामीण कादंबरी आस्वाद आणि समीक्षा

* संपादक : डॉ.सग्राम टेकले.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

* शौर्य पब्लिकेशन
अरूण बी.गोदाम,
खाडगाव रोड, कपील नगर,
लातूर-४१३५१२
www.rjourals.co.in
Email- hitechresearch११@gmail.com
मो.८१४९६६८९९९

© सर्व हक्क संपादकाधीन

* प्रथमावृत्ती :- ३० नोव्हेंबर २०१७ (विजयादशमी )

मुखपृष्ठ सजावट : श्री.सूर्यकांत उमशेट्टे

* मूल्य : ५००/-

---

मराठी ग्रामीण कादंबरी आस्वाद आणि समीक्षा या संपादकीय ग्रंथातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी संपादक, प्रकाशक, मुद्रक, वितरक सहमत असतीलच असे नाही.

४०

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

# ग्रामीण जीवनातील स्त्रियांचे वास्तवदर्शनः झिम् पोरी झिम्

प्रा.सखाराम कदम

ग्रामीण स्त्री ही एक स्त्री म्हणूनही संस्कार भेदाने वेगळेपणाने उठून दिसते. नागर स्त्रीच्या तुलनेत ग्रामीण स्त्रीचे भावविश्व निश्चितच वेगळ्या स्वरुपाचे आहे. या पाठीमागे ती ज्या संस्कारात, परिसरात वाढली त्या परिसरातील जाणिवाच कारण आहेत. 'झिम् पोरी झिम्' मधील 'जनी' ही या कादंबरीची कथा नायिका तिच्या भावविश्वाच्या मुळाशी असणारी आंतरीक जाणीव तिच्या वागण्या - बोलण्यातून प्रसंगपरत्वे प्रकट करते.

मराठी ग्रामीण कादंबरीत चित्रित झालेल्या स्त्रीचे भावविश्व, तिची मानसिकता, तिंची मनोवृत्ती आणि कुटुंबातील समस्यांसंदर्भातील विशेषत : पती, मुले, नातलग, यांच्यातील संबंध, तिच्या आशा आकांक्षा, स्वप्ने, तिच्या मनातील विकारवासना या सर्व गोष्टी रुढीग्रस्त पारंपरिक मूल्यांशीच निगडीत असलेल्या दिसून येतात. घराण्याचे वळण, सासर - माहेर, जातीपरंपरेचा पगडा, कौटुंबीक नात्यांमधली भावनिकता अशा रुढ चाकोरीत ग्रामीण स्त्रीच्या मनाची जडणघडण झालली असते. त्यातून स्त्री म्हणूनही पुरुषी समाज व्यवस्थेने पूर्वापार घातलेले निर्बंध ही एक तिच्या बाबतीत लक्ष्मणरेषा ठरते. 'झिम् पोरी झिम्' मधील जनी बाईचा जन्म म्हणून हे सर्व सनातन नीतीनियम मुकाटपणे आणि स्वाभाविकतेने जन्मभर स्वीकारतांना दिसते. त्यातून तिच्या मनाची विशिष्ट ठेवण तयार झालेली आहे. कुटुंब स्त्रीच असतं हे नैसर्गिक सत्य आहे. पण मानवी कुटुंबात स्त्रीला गौणत्व आहे हे सांस्कृतीक सत्य ती मान्य करते. 'कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनाचे ययार्थ चित्रण किंवा स्पष्टीकरण त्या व्यक्तीच्या जीवनाचा सामाजिक व सांस्कृतीक संदर्भ लक्षात घेऊन वा तो घेतल्यावाचून देता गेत नाही.' (मराठी विश्वकोश :खंड १३ वा, म.रा.सा.सं. मंडळ मुंबई पृ. ३१२)

'मेलं नाही अजून आभाळ' या कवितासंग्रहातून शेतकऱ्यांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणाऱ्या बालाजी मदन इंगळे यांनी 'झिम् पोरी झिम्' या कादंबरीतून ग्रामीण परिसरातील 'जनी' या प्रतिनिधीक पात्राच्या व्दारे स्त्रीयांच्या व्यथा वेदना, भोगवटे मानसिक कुचंबना अतिशय मोजक्या शब्दांत पण प्रभाविपणे मांडल्या आहेत. चिप्पी खेळणारी बलभीमची जना, तिची पोटुशी आई, आईला शेतातील कामात मदत करणारी व वेळोवेळा जनाशी भांडणारी तई, यांच्यासह संगी, राधी, लक्षी, आर्ची ह्या कथानायिकेच्या बालमैत्रिणींसह पुढे शिकताना भेटलेली तनुजा या प्रत्येक स्त्रीच्या बाई पणाच्या व्यथा वेदनांचा एक अखंड ठसठसणारा पट आपल्यासमोर उलगडला आहे. शाळा शिकत शिकत घरकामही करावे लागत असल्यामुळे कावलेली जना समंजस असून वाचक मनाची पकड घेते. नैतिक मूल्यांचे काटेकोर पालन करते. तई

सोबत मंदिरात धुपारतीच्या वेळी जाऊनही ती आपल्या बहिणीच्या वर्तनाचे काही अंदाज बांधते. हे अंदाज कादंबरीला प्रवाहीत्त्व प्रदान करणारे आहेत. 'ताई' पाठोपाठ सरपण गोळा करण्यासाठी आईने जनाला पाठवल्यावर ती आपल्या तईचा शोध घेते यावेळेस तिला तिची बहिण बणमीच्या आड एका मुलासोबत विवस्त्र नको ते करताना पाहते या घटनेचा तिच्या मनावर खोलपर्यंत परिणाम होतो. तेथून पळून आल्यांनतरही तिच्या मनातील तईनं असं का करावं हा प्रश्न तिला वारंवार छळतो ही घटना आई - वडीलांना सांगावी की नाही या व्दंव्दात असतांना असं कळल्यावर आई व बापाच्या मनावर होणारा आघात त्यांना सहन होणार नाही म्हणून समंजसपणे गप्प बसते. तरीही वेळोवेळा दचकून उठणे, आपणही शहाणी झाल्यावर आपणासही असेच वागावे लागेल का? हा सनातन प्रश्न ती पुन्हा - पुन्हा उभा करते.

'लक्षी' ही नायिकेचीं बालमैत्रीण अगुदर शहाणी होते म्हणून तिचे लग्नही लवकर लावले जाते. तेव्हा या शहाणं होण्याची भिती जनीचा पिच्छा पुरवते. लक्षी माहेरी आल्यांनतर जेव्हा जनाला लग्नानंतरचे रात्रीचे उदास अनुभव सांगते तेव्हा जनीच्या मनावर त्याचा होणारा परिणाम ती स्वगतासारखी मांडतांना दिसते. याऊलट 'आर्ची' चा नवरा कसलेतरी औषध घेऊन रात्रभर तिला सतावतो असे जेव्हा ती सांगते तेव्हाही जना त्याची धसकी मनात घेते. या बालमैत्रिणी पैकी राधी ही शरीराने आडदांड असली तरी सतत खोड्या करणारी चित्रित केली आहे. शाळेत बसल्यावर अम्म्याला चिमटे घेणारी प्रभात फेरीत संगीच्या पायात पाय घालून तिला पाडणारी व नेहमी चावट अचकट विचकट बोलणारी ही राधीची व्यक्तीरेखा स्त्री जीवनातील एका अनोख्या पण शाश्वत स्वभावाला वाचका समोर उभी करते.

'ताई' चे लग्न ठरल्यापासून तिच्या हुंड्याची तडजोड म्हणून घरातील शेळ्या विकल्या जातात. तरीही लग्नानंतर जेव्हा सासर घरची माणसं तिला त्रास देतात, मारहाण करुन माहेरी पाठवतात तेव्हा या घटनेची जना केवळ निर्विकार साक्षी राहते. तरीही तिच्या मनातील गोंधळ काही केल्या संपत नाही. सतत भावनांचा होणारा कोंडमारा घुसमट यामुळे या कादंबरीतील निवेदन प्रभावी व ओघवते आले आहे.

'झिम् पोरी झिम्' या कादंबरीला लोकजीवनाचा तळस्पर्श लाभलेला आहे. बालाजी इंगळे हा ग्रामीण कवी एकप्रकारे कथात्म, काव्यात्म रुपातून लोकजीवन आणि लोकमानसंच प्रकट करीत आहे. ग्रामीण जीवनाच्या अनुभूतीचाच तो भाग असल्यामुळे या कादंबरीत लोकजीवनाचा म्हणजे लोकसाहित्याचाच अविष्कार घडत जातो. लोकजीवनातील विनोद विसंगती दर्शक रचनेचे उदाहरण म्हणून पुढील रचना लक्षात घ्यावी.

अलिंगलोट पलिंगलोट पलंगाखाली पाखरु
वहिनी तुमचं लेकरु
लेकरु गेलं ताकाला, इच्चू चावला नाकाला
इच्याची भाजी मामीला, दुध पोळी मामाला
मामी देते वकाऱ्या, मामा खातो सुपाऱ्या
एक सुपारी किडकी, मामाची बायको लाडकी
अलिंगलोट पलिंगलोट.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

'झिम् पोरी झिम्' या कांदबरीला लोकतत्व लोकसाहित्याचा भक्कम आधार आहे. येथील झिम्मा खेळतांना म्हटलेले गाणे असो वारामतात्याचा शेतातील येळावसीचं चित्रमय वर्णन असो. तईला व लक्षीला झालेला विटाळ असो किंवा त्यानंतर त्यांना न्हाऊ घालून गाणे म्हणणाऱ्या स्त्रीया, उखाणे घेणाऱ्या स्त्रीया या लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या खऱ्या वाहक म्हणून कार्य करतात. येथील रांधी, लक्षी, संगी, आर्ची अन् बेबी जे नाचायचे गांणं म्हणतात ते पहा-

जुंधळ्याचा पाला जुंधळ्यावानी
सासरा दिसतो गोंधळ्यावानी
तुरीचा पाला तुरीवानी
सासू दिसते पोरीवानी नारळाचा पाला नारळावानी
नणंद दिसते नागिणीवानी
वाघट्याचा पाला वाघट्यावानी
दिर दिसतो हालगटावाणी

येथपर्यंत सासरच्या सर्व माणसाचे चित्र विडंबनात्मक पध्दत्तीने आले असले तरी नवऱ्याचे चित्र रेखाटतांना मात्र ह्या सगळ्याजनी नाचता नाचता म्हणतात.

गव्हाचा पाला गव्हावानी
नवरा दिसतो देवावानी

ग्रामीण स्त्रीला नवरा हा मोठा आधार वाटत असतो. तिची सारी भिस्त नवरा म्हणून एकट्या पुरुषावर असल्याचेच हे निदर्शक आहे. या ग्रामीण स्त्रीच्या भावविश्वाचा तो केंद्रबिंदू असतो. पतीव्रत्य संस्कारामुळेच ती त्याच्याठायी निष्ठा वाहतांना दिसते.

या कादंबरीतून नायिकेच्या मनातील शिक्षण विषयक आस्था हाच खरा आशावाद ती बाळगून आहे. ती वर्गात हुशार असून शिक्षण घेण्यासाठी अहोरात्र तळमळ व्यक्त करते. यासाठी घरातील कामे व अभ्यास यांच्यात ती तडजोड करते. उमरग्याच्या शाळेंतील प्राध्यापकाची मुलगी असणारी तनुजा 'जना'च्या अंगभुत गुणांमुळे तिची जीवलग मैत्रिण होते.केवळ अभ्यासातीलचं नव्हे तर जनाच्या आई - वडीलांची समजूत काढून तिला शिक्षण देण्यासाठी तिच्या आई-वडिलांना प्रवृत्त करते. डी.एड.ला नंबर लागल्यानंतर नोकरीचे स्वप्न पाहणारी नायिका मात्र वडीलांच्या आग्रहाखातर लग्न करते. नवऱ्याच्या संशयी स्वभावामुळे पुन्हा एकंदा या 'बाई' पणाच्या व्यथा अधिक गडद होऊ लागतात.

'झिम् पोरी झिम्'या कादंबरीचे बलस्थान म्हणून आपणास निवेदनासाठी उपयोगात आणलेली बोलीभाषा लक्षात घ्यावी लागते. उमरगा, उदगीर या महाराष्ट्र कनार्टक सिमेवरील प्रदेशातील बोली येथे उपयोगात आणली आहे. अनेक कानडी शब्दही कादंबरीत आलेले दिसून ,येतात. 'दिसलालतं, वाटलालतं, शिकलते, यीवलालते' ही क्रियापदाची रुपे प्रकर्षाने वेगळेपण नोंदवतात. या भाषेचे स्वरुप वैशिष्ट्ये समजण्यासाठी आपण कांदबरीचा शेवटचा परिच्छेद लक्षात घ्यावा. तो असा.....

''मी विचार केले आता आपल्याला लेकरु हुलालय, त्येच्यासाठी आपल्याला जगावचं

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

लागलं. नवकरी करावचं लागलं. ही नवऱ्याची संशयाची रात्रीच्या राक्षसीपणाची, परिस्थितीची सगळी राख आता फुंकून टाकू. उगू तीच - तीच विचार करुन जाळ विझू देण्यात काय फायदा नाही. विचार करून तर का होणाराय. आपूनच आता कायतर करावं लागलं. असा शेंबडात माशी गुंडाळल्यावाणी बसून काय होतनी. आजपासून निवड मंडळाच्या परिक्षेचा अभ्यास चालू करु. वतलापुढून उठले. करकचुन केस बांधले अन् आंघोळीला आले.''संपूर्ण कादंबरी वाचून संपली तरी येथील स्त्रीचा झिम्मा मात्र मनात कायम फेर धरुन 'झिम् पोरी झिम्' म्हणत राहतो.

**संदर्भग्रंथ सूची :-**


१. 'झिम् पोरी झिम्' - बालाजी इंगळे.


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani